स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# महाराष्ट्र शासन

## उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१.

www.dhepune.gov.in फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ Email: mavi.dhepune@gov.in

एनजीसी/२०२२/नॅक/अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/ 10700 दि. .०७.२०२२

27 JUL 2022

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य.

२. सर्व कुलसचिव, अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

**विषय -** नॅक पुनर्मूल्यांकन व मानांकनाबाबत....

उपरोक्त विषयान्वये आपल्या विभागातील अधिनस्त अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित महाविद्यालयांनी NAAC च्या Cycle, I,II,III... अंतर्गत नॅक पुनर्मूल्यांकन व मानांकन करुन घेतलेले असून त्यांची नॅक Accreditation वैधता संपुष्टात आली आहे, व त्यापुढील Cycle अंतर्गत महाविद्यालयाचे पुनर्मूल्यांकन व मानांकन करुन घेतलेले नाही असे नॅकच्या संकेतस्थळावरील Database माहितीवरुन निदर्शनास आले आहे (सोबत विभागनिहाय महाविद्यालयाची यादी जोडली आहे.) "महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६" कलम १०९ मधिल पोटकलम ०६(क) (ख) नुसार महाविद्यालयाचे नॅक पुनर्मूल्यांकन व मानांकन करुन घेणे अनिवार्य आहे.

या पत्राद्वारे आपणास कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित महाविद्यालयांनी (सोबत जोडलेल्या यादीनुसार) पुढील Cycle नुसारचे नॅक पुनर्मूल्यांकन व मानांकन करुन घेण्याच्या दृष्टीने संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य, संस्थाचालक प्रतिनिधी, IQAC समन्वयक यांची एकत्रित कार्यशाळा/बैठक आयोजित करावी. तसेच संबंधित महाविद्यालयाचे नॅक Cycle नुसार नॅक पुनर्मूल्यांकन व मानांकन करुन घेण्याबाबत आपल्या स्तरावरुन कळवावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास तात्काळ सादर करावा.

कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांनाही कळविण्यात येते की, आपल्या विद्यापीठ परिक्षेत्रातील अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित महाविद्यालयांचे नॅक या पुढील Cycle नुसार पुनर्मूल्यांकन व मानांकन करुन घेण्याच्या दृष्टीने सदरील महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचालक प्रतिनिधी, IQAC समन्वयक यांची विद्यापीठ स्तरीय कार्यशाळा/बैठक आयोजित करावी तसेच सर्व संबंधित महाविद्यालयांना NAAC नॅक पुनर्मूल्यांकन व मानांकन करुन घेण्याबाबत आपल्या स्तरावरुन कळवावे. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास तात्काळ सादर करावा.

सोबत : - विभागनिहाय नॅक वैधता संपलेल्या महाविद्यालयांची यादी. (दि.१५ जुलै २०२२ अखेर)

**(डॉ.धनराज माने)**
**शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रत-** १. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मंत्रालय,मुंबई.

२. कुलसचिव, संबंधित अकृषि विद्यापीठे.

e:\takalikar 23 9 19 back up\madam pc\taklikar\aur\bad-m.vi\naac\2021 may\25.05.2021 letter to all jd.docx